# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३२६, ३४९, ३५०–२०१०/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अकबरअल्ली साहेबहजरत काझी, ( केस क्र. ३२६/१०)<br>मु.पो. नाझरे, ता. सांगोला, जि. सोलापूर. | अर्जदार |
| २) | सौं. छाया सिध्देश्वर इंगोले, ( केस क्र. ३४९/१०)<br>मु.पो. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर. | |
| ३) | श्री. रामचंद्र धोंडी इंगोले, ( केस क्र. ३५०/१०)<br>मु.पो. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर. | |

**विरूध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, ऊर्जा नगर, सोलापूर | विरूध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, सांगोला, जि. सोलापूर | |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या तिन्ही तक्रार प्रकरणांची सुनावणी एकाचवेळी झाली आहे, त्यातील मागणी एकच असून वि.प.चा बचावही सारखाच आहे. ग्राहक प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांनी मंचाकडे अनुसूची 'अ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द तक्रारी दाखल केल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

१)	श्री.अकबरअल्ली साहेबहजरत काझी,   ( केस क्र. ३२६/१०)

श्री.अकबरअल्ली साहेबहजरत काझी, मु.पो. नाझरे,  ता. सांगोला,  जि. सोलापूर हे वितरण कंपनीचे ग्राहक आहेत.  नाझरे, ता. सांगोला येथील गट क्र. ३९७ मध्ये शेतीपंपास ५ अश्वशक्ती नवीन वीज जोडणी तात्काळ मिळावी यासाठी स्वखर्चाने एल.ई.सी. च्या माध्यमातून वाहिनी उभी करुन घ्यावी व अंदाजपत्रकाच्या १.३% नॉर्मेटिव्ह चार्जेसच्या दराने सूपरव्हीजन करणेसाठी दर आकारेल असे वि.प.तर्फे सांगण्यात आले. त्यानुसारEE/PPR/AG/DDF/175/ 07-08   ने मंजुरी मिळाली. हे अंदाजपत्रक रु.२६,२२५/- इतक्या रकमेचे असून वि.प.ने १.३% या दराने नॉर्मेटिव्ह चार्जेस रु. ३४०/- ह्या सह दिलेले चलन ग्राहकाने पावती क्र. ८७०४३१० दि. २९.९.२००८ नुसार भरले आहे. वितरण कंपनीने ग्राहकास दि. ३१.१०.२००८ रोजी अेजी-१२४ (३४०२५०६३४०४३)  या क्रमांकाने वीज पुरवठा केलेला आहे. हा वीज पुरवठा देतांना वितरण कंपनीने ग्राहकाच्या कंत्राटदाराला सांगून मिटरही ग्राहकास स्वखर्चाने  बसविणेस भाग पाडले.  वि.प.ची ही कृती मा. आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत आहे व वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चे विरुध्द आहे. यापूर्वी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर येथे तक्रार दाखल केली.  त्यामध्ये दि. ३०.१०.२०१० ला आदेश झाले. त्यामध्ये परतावा रक्कम ग्राहकाला वीज वापराच्या नियमित बिलामधून परत करण्यात यावी असे आदेश झाले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील दि. १०.१२.२०१० ला मंचासमोर दाखल केले.  त्यामध्ये मा. विद्युत नियामक आयोग यांचे केस क्र. ३६/२००९ मधील आदेशानुसार अंदाजपत्रकीय रकमेचा परतावा मिळावा, ग्राहकाने चलन भरले दिनांकापासून परताव्याची रक्कम मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२.६ नुसार व्याज मिळावे, परताव्याची रक्कम कंपनीच्या एखाद्या परिपत्रकाप्रमाणे न करता, मा. आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशानुसार मिळावा, तो एक रकमी बिलातूनच परंतु पूर्ण बील या स्वरुपात मिळावा असे आदेश व्हावेत अशी मागणी केली आहे. तसेच वि.प.चे परिपत्रक  क्र.२२१९७ दि. २०.५.२००८ नुसार भविष्यातील येणारे पूर्ण बील वजा करावे व हा संपूर्ण परतावा मिळेपर्यंत ग्राहकाकडून कोणतेही वीज बील वि.प.ने वसूल करु नये असा आदेश मिळावा अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीला दि. ३०.१२.२०१० पर्यंत लेखी अहवाल सादर करण्यात कळविले होते, तो या कार्यालयात दि. ३.१.२०११ ला प्राप्त झाला.  त्यामध्ये ग्राहकास देय असणारी रक्कम एक रकमी तसेच रोख स्वरुपात देता येणार नाही. मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ नुसार सर्वोच्च न्यायालयात चालू असलेल्या केसला निकाल लागून आदेश पारित झाल्यानंतर ही रक्कम तक्रारदारास या पुढे देण्यात येणाऱ्या वीज देयकामधून नियमितपणे वजा करुन देण्यात येईल.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १०.२.२०११ ला ठेवण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी उपस्थित नसलयाने सुनावणी झाली नाही. त्यानंतर वि.प.चे कार्यकारी अभियंता, पंढरपूर यांनी नोडल ऑफीसर सोलापूर यांना अग्रेषित केलेल्या दि. १०.२.२०११ च्या पत्राची प्रत मंचामध्ये दि. २३.२.२०११ ला प्राप्त झाली.  त्यामध्ये ग्राहकाचे वीज कनेक्शन नॉन डी.डी.एफ. योजनेमध्ये समाविष्ट केले आहे व नियमानुसार खर्चाची रक्कम रु. २२१८६/- ग्राहकाचे नियमित वीज बिलात समायोजित करीत आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी दि. ४.३.२०११ रोजी मंचासमोर ठेवण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री.खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. शितोळे, उप कार्यकारी अभियंता उपस्थित. श्री. शितोळे यांनी रु.२२१८६/- परतावा देण्यास तयार आहोत असे सांगितले. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी त्यास मान्यता दिली, परंतु ५०% रक्कम वीज बिलातून समायोजित करण्यास हरकत घेतली.

२) सौं. छाया सिध्देश्वर इंगोले ( केस क्र. ३४९/१०)

सौं. छाया सिध्देश्वर इंगोले, रा. संगेवाडी, ता. सांगोला यांनी चलन रु. १५०/- पावती क्र. ५३००१६३ दि. ११.८.२००८ नुसार भरले आहे. त्यांनी आपली शेती गट क्र. ५७/२ संगेवाडी येथे ५ अश्वशक्ती नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी अर्ज केला होता. वि.प.ने १.३% डी.डी.एफ. चार्जेस रु.१५०/- भरुन घेतले आहेत. त्यांना विद्युत पुरवठा दि. ३.६.२००९ रोजी अे.जी. ६०० (३४००५०६१८९३१) नुसार सुरु झाला. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार ज्या डी.डी.एफ. योजनेतून त्यांना हा वीज पुरवठा देण्यात आला तो डी.डी.एफ. निर्देशांचे पालन न होता केला गेला व मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाच्या विपरीत आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर येथे तक्रार दाखल केली. त्यामध्ये मुदतीत आदेश न झालेने मंचाकडे दि. २८.१२.२०१० ला तक्रार दाखल केली. मंचाकडे ग्राहकाने अर्ज करेपर्यंत अंतर्गत कक्षाचे कुठलेही आदेश झाले नाहीत. ग्राहकाने परताव्याची रक्कम व्याजासह पूर्ण बील या स्वरुपात पूर्ण रक्कम फिटेपर्यंत / देय रक्कम निरंक होईपर्यत समायोजित करणे बाबत वि.प.स आदेशा द्यावेत अशी मागणी केली. ग्राहकाकडून वि.प.ने सर्व्हीस कनेक्शनसाठी १.३% प्रमाणे रु. ३०/-, कपॅसिटरसाठी रु. १००/- व अॅप्लीकेशन प्रोसेसिंग फी रु. ७०/- भरन घेतले आहेत. सदरच्या रकमा परत करण्याचे आदेश व्हावेत अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपला लेखी अहवाल दि. १७.१.२०११ पर्यंत नोटीस देवूनही दाखल केला नाही. कार्यकारी अभियंता, पंढरपूर यांचे दि. १८.१.२०११ चे नोडल ऑफीसर, सोलापूर यांना अग्रेषित केलेले पत्राची प्रत प्राप्त झाली. त्यामध्ये अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार ग्राहकाचे वीज कनेक्शन नॉन डी.डी.एफ. योजनेमध्ये समाविष्ट करीत आहे व नियमानुसार खर्चाची रक्कम रु. ९,१११/- यांचे कनेक्शन चालू केल्यानंतर त्यांचे नियमित वीज बिलात समावेश करीत आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी दि. ४.३.२०११ रोजी मंचासमोर घेतली असतां, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी रु. ९,१११/-/- परतावा देण्यास तयार असल्याचे सांगितले. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी त्यास मान्यता दिली, परंतु सदर रक्कम बिलातून समायोजित करण्याच्या व्यवस्थेबद्दल हरकत घेतली. ५०% रक्कम वीज बिलातून समायोजित करण्याऐवजी पूर्ण रक्कम बिलातून समायोजित करावी अशी मागणी केली. प्रस्तुतची सुनावणी दि. १०.२.२०११ ला सोलापूर येथे ठेवली होती, परंतु ग्राहक प्रतिनिधी उपस्थित नसल्याने स्थगित करण्यात आली.

३) श्री. रामचंद्र धोंडी इंगोले ( केस क्र. ३५०/१०)

श्री. रामचंद्र धोंडी इंगोले, रा. संगेवाडी, ता. सांगोला यांनी आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांच्यामार्फत दि. २८.१२.२०१० ला मंचामध्ये तक्रार दाखल केली. ग्राहकाने आपली शेती गट क्र. ३२३/१, संगेवाडी येथे ५ अश्वशक्ती शेतीपंप नवीन वीज जोडणीची वि.प.कडे मागणी केली.

वि.प.ने अंदाजपत्रकाच्या १.३% नॉर्मेटिव्ह चार्जेसच्या दराने स्वत: सुपरविजन करणेसाठी दर आकारुन रु. ४२०/– दि. २०.१०.२००८ रोजी पावती क्र. ८७०४५८८ नुसार ग्राहकाकडून भरुन घेतले. तसेच कपॅसिटर फी रु. १००/–, ॲप्लीकेशन प्रोसेसिंग फी रु. ७०/– व डिपॉझीट भरुन घेतले आहे. वितरण कंपनीने ग्राहकाचा दि. १८.१२.२००९ रोजी वीज पुरवठा सुरु केलेला आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार सदरचा वीज पुरवठा देतांना वि.प.ने चुका केल्या आहेत. वि.प.ने दि. २०.५.२००८ चे परिपत्रक क्र. २२१९७ चे पालन केले नाही. मा. आयोगाच्या आदेशाविरुध्द कृती करुन ग्राहकाचे पैंसे भरुन घेतले. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. २०.१०.२०१० ला अर्ज केला. कक्षाने आदेश न केल्याने प्रस्तुतची तक्रार मंचाकडे दाखल केली. त्यामध्ये मा. आयोगाचे दि. १.९.२०१० चे केस क्र. ९३/२००८ नुसार अशी वसूल केलेली जादा रक्कम वीज बिलातून ग्राहकास परत देणेबाबत आदेश आहेत. तथापि कंपनीच्या परिपत्रकानुसार समायोजन करु नये, परतावा पार्ट पेमेंट या स्वरुपात असू नये तो पूर्ण बील या स्वरुपात संपूर्ण देय रक्कम फिटे पर्यंत किंवा देय रक्कम निरंक होईपर्यत मिळावा व चलन भरल्याचे दिनांकापासून सदर रकमेवर विद्युत कायदा २००३ चे कलम ६२.६ नुसार व्याज मिळावे अशी मागणी केली आहे. तसेच वि.प.ने भरुन घेतलेली कपॅसिटर फी रु. १००/–, ॲप्लीकेशन प्रोसेसिंग फी रु. ७०/– परत देण्याचे आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने आपला लेखी अहवाल दि. १७.१.२०११ पर्यंत नोटीस देवूनही दाखल केला नाही. कार्यकारी अभियंता, पंढरपूर यांचे दि. २४.१.२०११ चे नोडल ऑफीसर, सोलापूर यांना अग्रेषित केलेले पत्राची प्रत प्राप्त झाली. त्यामध्ये अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार ग्राहकाचे वीज कनेक्शन नॉन डी.डी.एफ. योजनेमध्ये समाविष्ट करीत आहे व नियमानुसार खर्चाची रक्कम रु. २९,१७२/– यांचे कनेक्शन चालू केल्यानंतर त्यांचे नियमित वीज बिलात समावेश करीत आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुतची तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. १०.२.२०११ रोजी सोलापूर येथे ठेवण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी यांनी केस क्र. २६८/१० मध्ये या तक्रारीचा उल्लेख करुन मुदतवाढ मागितली. त्यामुळे प्रस्तुतची सुनावणी कोल्हापूर येथे दि. ४.३.२०११ ला घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. शितोळे, उप कार्यकारी अभियंता उपस्थित. श्री. शितोळे यांनी ग्राहकास रु.२९१७२/– देण्यास तयार असल्याचे सांगितले. श्री. खापरे यांनी सदर रकमेबद्दल तक्रार केली नाही, परंतु समायोजन पध्दतीस हरकत घेतली. सदरची रक्कम ५०% बिलात समायोजन न करता ती पूर्ण बील या स्वरुपात समायोजन करावी अशी मागणी केली.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या तिन्ही तक्रारीत मागणी केल्याप्रमाणे परताव्याच्या रकमेचे समायोजन एका बिलात पूर्ण बील या स्वरुपात समायोजन करण्याचे आदेश वि.प.स देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे.

कारणमिमांसा

वितरण कंपनीने या तिन्ही तक्रारीमध्ये परताव्याच्या रकमांची माहिती श्री. शितोळे, उप कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत मंचासमोर तोंडी व प्रत्येक केसमध्ये लेखी स्वरुपात दिल्या आहेत व त्या परत देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. त्या रकमा निश्चितपणे WCR किंवा खर्चाचे ऑडीटेड स्टेटमेंट प्रमाणे आहेत. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी त्या रकमांस मान्यता दिली आहे. त्यामुळे ग्राहकास या तिन्ही केसमध्ये वि.प.ने तयारी दाखविलेल्या रकमा मिळण्याचा हक्क आहे. आता प्रश्न राहतो तो की, परतावा देण्याचे स्वरुप काय असावे (Mode of repayment ). वि.प.ने आपल्या लेखी अहवालात परतावा रक्कम वीज बिलात समायोजित करीत आहोत असे म्हटले आहे. सदरची रक्कम रोखीने देण्यास हरकत घेतली आहे. ग्राहकाची तक्रारीतील मागणी पहातां, मा. आयोगाचे दि. १.९.२०१० चे केस क्र. ९३/२००८ मधील आदेशानुसार Adjustmente of extra charges collected by MSEDCL through energy bill अशा स्वरुपाचे आदेश आहेत. थोडक्यात, वि.प.ने आपल्या परिपत्रकानुसार समायोजन न करता मा. आयोगाच्या आदेशानुसार वीज बिलातून करावे अशी मागणी केली आहे. ग्राहक प्रतिनिधींनी केस क्र. ३२६ मध्ये वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ हे मा. आयोगाचे केस क्र. ९३/२००८ मधील आदेशास मिळते जुळते असल्यामुळे या परिपत्रकाप्रमाणे भविष्यातील येणारे पूर्ण बील वजा करावे व हा संपूर्ण परतावा मिळेपर्यंत ग्राहकाकडून कोणतेही वीज बील वि.प.ने वसूल करु नये अशी मागणी केली आहे. थोडक्यात, मासिक बिलाच्या ५०% रक्कम समायोजन करण्यास हरकत घेतली आहे. म्हणजेच दि. २१.१२.२००९ चे परिपत्रकानुसार समायोजन करु नये. या तिन्ही तक्रारीतील विद्युत पुरवठा तारीख पहातां, निश्चितपणे हा वीज पुरवठा दि. २०.५.२००८ नंतर (केस क्र. ३२६/१० श्री.अकबरअल्ली साहेबहजरत काझी – विद्युत पुरवठा दि. ३१.१०.२००८, केस क्र. ३४९/१० सौं. छाया सिध्देश्वर इंगोले – चलन दि. ११.८.२००८ रोजी भरले व विद्युत पुरवठा दि. ३.६.२००९, केस क्र. ३५०/१० श्री. रामचंद्र धोंडी इंगोले –चलन दि. २०.१०.२००८ रोजी भरले व विद्युत पुरवठा दि. १८.१२.२००९ ) सुरु झाला आहे. वि.प.ने आपल्या स्वतःच्या परिपत्रकानुसार ग्राहकाकडून खर्चाची रक्कम इन्फ्रास्टक्चर कॉस्ट वसूल केली आहे ती मा. आयोगाच्या आदेशा विरुध्द आहे. अशा परिस्थितीत दि. २१.१२.२००९ चे वि.प.च्या परिपत्रकाप्रमाणे परतावा रकमेचे समायोजन प्रत्येक मासिक बिलात ५०% करणे असे आदेश देणे कायदेशीर व संयुक्तिक होणार नाही असे मंचाचे मत झाले आहे.

ग्राहक श्री. अकबरअल्ली साहेबहजरत काझी (केस क्र. ३२६/२०१० ) मधील परताव्याची रक्कम रु. २२१८६/– त्यांचे कनेक्शन ए.जी. १२४ या माध्यमातून वीज वापराच्या देयकामधून पूर्ण रक्कम फिटेपर्यंत / रक्कम निरंक होईपर्यंत समायोजन करण्यात यावे. तसेच तक्रारदारास मीटर खर्च करण्यास वि.प.ने भाग पाडले असे म्हटले आहे. त्याबाबत वि.प.ने कुठलीही हरकत घेतली नाही, म्हणणे दिले नाही. वि.प.ने ग्राहकास मीटरची किंमत ग्राहकाने पावती हजर केल्यानंतर रोखीने त्वरित द्यावी असे मंच आदेश देत आहे. १.३% सुपरव्हीजन चार्जेस रु. ३४०/– रोखीने त्वरीत द्यावेत.

सौं. छाया सिध्देश्वर इंगोले ( केस क्र. ३४९/१०) या केसमधील खर्चाची रक्कम रु. ९,१११/– या रकमेचे समायोजन ग्राहकाने विद्युत कनेक्शन ए.जी. ६०० या माध्यमातून वीज वापराच्या देयकामधून पूर्ण रक्कम फिटेपर्यंत / रक्कम निरंक होईपर्यंत समायोजन करण्यात यावे.

या ग्राहकाने आपल्या तक्रारीत कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/–, १.३% सुपरव्हीजन चार्जेस रु.१५०/– – भरुन घेतले आहेत, या बद्दल वि.प.ने आपल्या लेखी अहवालात कांही खुलासा केलेला नाही. मा. आयोगाच्या आदेशाविरुध्द सर्व्हीस कनेक्शन, कपॅसिटर टेस्टिंग फी, अर्ज प्रोसेसिंग फी भरुन घेतली आहे हे निश्चितपणे सिध्द होते. अशी रक्कम परत मिळण्याचा ग्राहकाचा हक्क आहे. वि.प.ने वरील प्रमाणे रु.१००+१५० = रु. २५०/– ग्राहकास रोखीने त्वरित द्यावी.

श्री. रामचंद्र धोंडी इंगोले ( केस क्र. ३५०/१०) या केसमधील खर्चाची रक्कम रु. २९,१७२/– या रकमेचे समायोजन ग्राहकाने विद्युत कनेक्शनच्या वीज वापराच्या देयकामधून पूर्ण रक्कम फिटेपर्यंत / रक्कम निरंक होईपर्यंत समायोजन करण्यात यावे. या ग्राहकाने आपल्या तक्रारीत कपॅसिटर टेस्टिंग फी रु.१००/–, १.३% सुपरव्हीजन चार्जेस रु. ४२०/– भरुन घेतले आहेत, या बद्दल वि.प.ने आपल्या लेखी अहवालात कांही खुलासा केलेला नाही. वि.प.ने रु. ५२०/– ग्राहकास रोखीने त्वरित द्यावे.

थोडक्यात, मा. आयोगाचे केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशानुसार परताव्याच्या रकमा ग्राहक ास वि.प.ने आपले परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ प्रमाणे ५०% मासिक बिलातून न देता प्रत्येक महिन्यात पूर्ण रक्कम समायोजित होईपर्यंत क्रेडीट द्यावे.

प्रश्न राहतो तो की, या तिन्ही तक्रारींमध्ये ग्राहकांनी विद्युत कायदा २००३ मधील कलम ६२.६ प्रमाणे चलन भरल्याचे दिनांकापासून प्रस्तुतची रक्कम मिळेपर्यंत व्याज मिळावे अशी मागणी केली आहे. ग्राहकाचे तक्रारीतील मजकूर पहांता, निश्चितपणे वि.प.ने आपले परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ नंतर वीज जोडणी देतांना कार्यवाही केली आहे. ती मा. आयोगाची केस क्र. ७०/२००५ मधील आदेश दि. ८.९.२००६, केस क्र. ५६/२००७ मधील आदेश दि. १६.२.२००८ च्या विरुध्द आहे. त्यामुळे ग्राहकास वि.प.कडून परताव्याच्या रकमेवर व्याज मिळणेचा अधिकार आहे, कारण वि.प.ने सदरच्या रकमा वसूल करुन Unjust enrichment कृती केली आहे., मा. आयोगाच्या आदेशानुसार ती थांबविणे जरुरीचे आहे. त्यासाठी कलम ६२.६ विद्युत कायदा २००३ मधील तरतुदीनुसार बँक दराने व्याज मंजूर करणे योग्य होईल. मा. आयोगाने आपल्या टॅरिफ ऑर्डरमध्ये ३ महिन्यानंतर थकलेल्या बिलावर व्याजाची सुविधा वितरण कंपनीला दिली आहे. या ठिकाणी वीज जोडणी दिलेल्या तारखेपासून ती रक्कम पूर्णपणे बिलातून समायोजित होईपर्यंत ग्राहकास या रकमेवर व्याज मिळण्याचा हक्क आहे व वि.प.ला कलम ६२(६) विद्युत कायदा २००३ नुसार असे आदेश देणे योग्य होईल.

## आदेश

१) तक्रार क्र. ३२६, ३४९, ३५०/२०१० मंजूर करणेत येत आहेत.

२) वि.प.ने तक्रार क्र. ३२६/२०१० मधील ग्राहक श्री. अकबरअल्ली साहेबहजरत काझी यांना रु. २२१८६/– त्यांच्या वीज बिलातून ती रक्कम फिटेपर्यंत समायोजन करण्यात यावी. त्या रकमेवर १२% व्याज हे वीज जोडणी दिलेल्या तारखेपासून वीज बिलातून परतावा/ समायोजन सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी द्यावे. तसेच सुपरव्हीजन चार्जेस १.३% रु. ३४०/– रोखीने द्यावेत.

३) वि.प.ने तक्रार क्र. ३४९/१० मधील ग्राहक सौं. छाया सिध्देश्वर इंगोले यांना रु. ९,१११/– त्यांच्या वीज बिलातून ती रक्कम फिटेपर्यंत समायोजन करण्यात यावी. त्या रकमेवर १२% व्याज हे वीज जोडणी दिलेल्या तारखेपासून म्हणजे दि. ३.६.२००९ पासून वीज बिलातून परतावा / समायोजन सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी द्यावे. वि.प.ने ग्राहकास कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/– व १.३% सुपरव्हीजन चार्जेस रु. १५०/– असे एकूण रु. २५०/– ग्राहकास रोखीने त्वरित द्यावे.

४) वि.प.ने तक्रार क्र. ३५०/१० मधील ग्राहक रामचंद्र धोंडी इंगोले यांना रु. २९,१७२/– त्यांच्या वीज बिलातून ती रक्कम फिटेपर्यंत समायोजन करण्यात यावी. त्या रकमेवर १२% व्याज हे वीज जोडणी दिलेल्या तारखेपासून म्हणजे दि. १८.१२.२००९ पासून वीज बिलातून परतावा/ समायोजन सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी द्यावे. वि.प.ने ग्राहकास कपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/– व १.३% सुपरव्हीजन चार्जेस रु. ४२०/– असे एकूण रु.५२०/– ग्राहकास रोखीने त्वरित द्यावी.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

## <u>ग्राहक तक्रार क्र. ३२६/२०१०, ३४९/२०१०, ३५०/२०१०</u>

मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या आदेशाशी सहमत नसल्यामुळे श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव स्वतंत्र मत नोंदवित आहे.

आदेशातील क्र. (२) नुसार ग्राहकास रु. २२,१८६/- (३) नुसार रु. ९१११/- व (४) नुसार रु. २९,१७२/- या रकमेवर १२% व्याज जोडणी दिल्याच्या तारखेपासून बिलातून परतावा सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी वितरण कंपनीने द्यावे यास माझी हरकत आहे.

कारणे -

१) सदरील ग्राहकास परताव्याची रक्कम ही वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ नुसार दिलेली आहे. शेतीपंपाचे कनेक्शन हे नॉन डी.डी.एफ. या सदराखाली समजून परतावा मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे आदेशातील क्र.२ नुसार वितरण कंपनीने ग्राहकास रु. २२,१८६/-, (३) नुसार रु. ९१११/- व (४) नुसार रु. २९,१७२/- ही परताव्याची रक्कम त्यांच्या वीज बीलातून समायोजित करुन द्यावी.

सदर परतावा हा परिपत्रक दि. २०.५.२००८ नुसार मान्य केला असून तो दि. २०.५.२००८ नंतर देणेत येणा-या वीज कनेक्शनसाठी लागू आहे. सदर परिपत्रकाच्या पहिल्या पॅरेग्राफमध्ये नमूद करण्यात आले आहे की,

There is a need to clarify and streamline the procedure for levying reasonable charges under Section 46 of EA 2003 and the regulations framed thereunder for releasing / upgrading connections. It has been brought to our notice by consumers and petitions before MERC that field staff are often making different subjective interpretation of Dedicated Distribution Facility (DDF) and Augmentation under Regulation 3.3.3 and 3.3.4 of MERC (Electricity Supply Code and other Conditions of Supply) Regulations 2005, resulting in confusion and hardship to the consumers. In order that field engineers follow uniform practice throughout the State and to avoid hardship to prospective consumers and to remove the difficulties in release of new connections, the following guidelines are issued which shall be subject to the final decision in the proceedings pending before the Hon'ble Supreme Court and MERC.

तसेच परिपत्रकातील Procedure to plan for electrifying areas and releasing new connections मधील मुद्दा (३) नुसार -

The list of pending applications in order of chronology, (categorywise) shall be maintained. In case any consumer or group of consumer wants early connection out of its own volition or choice, he may get the work executed at his expense under MSEDCL supervision and get the refund of the expenses so incurred through his energy bills. However he will have to get the estimates and specifications sanctioned from the appropriate authorities and he will not be required to pay supervision charges to MSEDCL.

परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ ची प्रत मा. सेक्रेटरी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना अग्रेषित केलेली आहे.



(२) ग्राहकाने सदरचा खर्च हा स्वतःहून लवकरांत लवकर कनेक्शन मिळण्यासाठीच केलेला आहे. परिपत्रकातील तरतुदीनुसार खर्चावरील व्याज देता येणार नाही, फक्त येणा-या बिलातून परतावा देता येईल. ग्राहकाने स्वत: खर्च केला नसता तर प्राधान्यक्रमानुसार ( as per chronology of pending applications ) त्यांना विद्युत पुरवठा मिळाला असता.

(३) व्याज देण्याबाबतचा कालावधी ठरविण्यास निश्चित आधार नाही किंवा पुढील कालावधीसाठी व्याज का देऊ नये हे स्पष्ट होत नाही. विद्युत कायदा २००३ कलम ६२(२) हे येथे लागू होत नाही, कारण ग्राहकाने वाहिनी उभारणी खर्चाची रक्कम वितरण कंपनीकडे जमा केली नाही किंवा भरुन घेतलेली नाही.

सदर ग्राहकास विद्युत पुरवठा हा दि. ३१.१०.२००८, ३.६.२००९ व १८.१२.२००९ रोजी देण्यात आला. परिपत्रकाच्या तरतुदीनुसार ग्राहकास येणा-या प्रथम बिलापासून परतावा देणे योग्य होईल. म्हणजे शेतीपंपासाठी त्रैमासिक बिलींग पध्दतीप्रमाणे परतावा चालू होणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. म्हणून वीज जोडणी नंतरच्या प्रत्येक बिलींग सायकल मधील वीज बिलाची ५०% रक्कम परताव्याच्या पहिल्या बिलातून एकदम समायोजित करावी, त्यासाठी व्याज व विलंब आकारणी करु नये.

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर